# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १२/०३/२०२१

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १२/०३/२०२१ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. ०५/०३/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. दिनेश तेजराज जैन हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दिनेश तेजराज जैन | सभापती |
| २. | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| ३. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ४. | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ५. | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | सदस्या |
| ६. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ७. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ८. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| ९. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. गिता हरीश परदेशी | सदस्या |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| २. | श्री. अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ३. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ४. | श्री. एलायस दुमिंग बांड्या | सदस्य |
| ५. | श्री. कमलेश यशवंत भोईर | सदस्य |

मा. सभापती :-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि . १२/०३/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८५, परिवहन सेवेचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्र कास मंजुरी मिळणेबाबत . प्रकरण क्र. ८६, अग्निशमन विभागाचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. प्रकरण क्र. ८७, मिरा

भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (“अ” + “क” + “महिला व बालकल्याण” + “अंध व अपंग” + “JNNURM” + “P” + “वृक्षप्राधिकरण” + “शिक्षण”)

राकेश शाह :-

सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रका तील काही लेखा शिर्षकाची सविस्तर माहिती होऊन चर्चा करवयाची असल्याने सदरची सभा तहकुब करण्यात येत आहे. सदरची सभा मंगळवार दि. १६/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

अनिल सावंत :-

माझे अनुमोदन आहे.

सभा तहकुब ठराव क्र. ७० :-

सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रका तील काही लेखा शिर्षकाची सविस्तर माहिती होऊन चर्चा करवयाची असल्याने सदरची सभा तहकुब करण्यात येत आहे. सदरची सभा मंगळवार दि. १६/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह          अनुमोदन :- श्री. अनिल सावंत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. ३.१५ वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका